# श्री. स्वप्नील कापडणीस, उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, यांचे कार्यालय, उमरखेड

क्रमांक/प्रस्तु-२/भु.सं/अका/कावि/ ५५० /२०१७ दिनांक ०३ /१०/२०१७

**भुसंपादन प्रकरण क्रमांक -०८/४७/२०१६-१७ मौजा चिंचोली (संगम) ता. उमरखेड जि. यवतमाळ**

## अधिसूचना

(भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणी पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-2013)

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांनी भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणी पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३(२०१३ चा ३०) (यापुढे ज्यांचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) यांच्या कलम-११ च्या पोट कलम-(१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, अधिसुचना, क्रमांक/ **४३०** दिनांक **०५/०७/२०१७** अन्वये प्रारंभीक अधिसुचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमीनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विर्नीदीष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, यवतमाळ जिल्हाधिकारी यांनी कलम-१५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम-१९ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीमध्ये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे. असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याआर्थी, अनुसुची तिन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटूंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असून, पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विर्नीदीष्ट केला आहे.

आणी ज्याआर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकाऱ्याची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी उमरखेड जि. यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

**** अनुसूची एक ****

**संपादीत करावयाच्या जमीनीचे वर्णन**

गाव **चिंचोली (संगम)** तालुका **उमरखेड** जिल्हा यवतमाळ

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | संपादना खालील क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| १ | ५८/२, ५८/३ | ०.२७ |
| एकूण क्षेत्र - | | **०.२७** |